# 'सवालांचा जबाब दे रे इंदिरा सरकारा!'

## शेतकरी-शेतमजूर महिलांचे बार्शी शिबिर

**कानोसा**

दुर्बलाला त्रास देणे फार सोपे असते. ती एक निरंतर दिसणारी दुष्ट प्रवृत्ती आहे. शहाणी-अडाणी, श्रीमंत-गरीब, पुरुष-स्त्री वगैरे कुणाचीही ती सहज-नैसर्गिक वृत्ती वाढावी इतकी सर्व माणसांमध्ये खिळलेली वृत्ती आहे. तरी सगळ्यांना ती नकोशी वाटते पण नष्ट होत नाही; अशी ही हरळीसारखी चिवट गोष्ट आहे. म्हणूनच अन्यायाच्या वाईट परिणामांचे परिमार्जन करणे एवढ्यावर थांबता येत नाही. थांबून उपयोगाचे नाही. तर दुर्बलांना आर्थिक-बौद्धिक-शारीरिक दृष्ट्या सबळ करणे असा मूले कुठार घावच घालायला हवा. या विचाराने परिस्थितीच्याही खोल गर्तेत गेलेल्या अल्प-भूधारक शेतकरी व शेतमजूर यांचे शिबिर घ्यावयाचा निर्णय घेतला. त्यांनी सबळ व्हायचे म्हणजे काय व कसे, संघटित व्हायचे ते कशासाठी व कसे, शिक्षण घेऊन जाणिवा वाढवायच्या कशा व कशासाठी, रोजगार हमी मिळवायची कशी, हक्क मिळवायचे का ? यांचा खल करावा; तसेच अल्प-भूधारक, शेतकरी व शेतमजूर यांचे परस्पर नाते जवळचे असून ते एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारखे आहे याचीही माहिती ग्रामीण भगिनींना असावी, या हेतूने बार्शीमध्ये महाराष्ट्र शेतकरी-शेतमजूर पंचायतीच्या वतीने व वर्कर्स एज्युकेशन बोर्डाच्या सहाय्याने अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर बायकांचे शिबिर १२ व १३ डिसेंबर रोजी घेतले. येथील गुजराथी समाज मंडळाने त्यांची शाळा व स्वयंपाकघरे मोफत दिल्याने आमची मोठीच सोय झाली. नगरपालिकेनेही पाणी मोफत दिले.

शनिवारी सकाळी ९ पासूनच खामगाव, बोरगाव, चारे, येडशी वगैरे गावांच्या बायका दाखल होऊ लागल्या. पुणे जिल्ह्यातील मुळशी-वेल्हे-हवेली तालुक्यांतील व्हिलेज कम्युनिटी डेव्हलपमेंट असोसिएशनच्या तीन भगिनी कार्यकर्त्या शुक्रवारी रात्रीच हजर होत्या. त्यांच्या येण्याने शिबिराची रंगत प्रथमपासूनच वाढत गेली. २५ ते ५५ वर्षे वयाच्या ४० बायका उपस्थित होत्या. एस्. टी. च्या घोटाळ्यामुळे मंगळवेढ्याच्या दोघी उशीराने सामील झाल्या. शनिवारी सकाळी १० पासून रविवारी रात्री ११ पर्यंत शिबिर चालू होते. सोमवारी सकाळच्या गाड्यांनीच परत जाता येणार होते. कधीही र, ट, प न लिहिलेल्या अन् 'अभ्यास' शब्दही न जाणणाऱ्या खेडूत बाया जाड बोजड विषयांनी भरगच्च शिबिर-कार्यक्रम मानतील का सरळ कंटाळून निघून जातील ही भीती होती. पण मन अभिमानाने अक्षरशः फुलावे असा अनुभव आला. शहरी महिला व युवकांना लाजवील अशा औत्सुक्याने त्या खेडूत भगिनी कान टवकारून सगळे ऐकत होत्या– वेळेला प्रश्न विचारत होत्या. 'नव्या युगाची ही नवमहिला आहे रणझुंजार' या गाण्याची उंच ललकार प्रत्येक बाईच्या मेंदूची शीर रोमांचाने फुलवित होती. 'आम्ही काळाच्या मागे राहू शकत नाही' ही ग्वाही जणू त्यांना द्यावयाची होती.

उद्घाटन 'मनाचे शिक्षण व संघटनारूपी दरवाजे' या विषयाने झाले. बार्शीच्या बी. एड्. कॉलेजच्या अध्यापिका विजयाताई देशपांडे यांनी उद्घाटन केले तर प्राचार्य व. न. इंगळेंनी अध्यक्षस्थान भूषविले. प्रा. विजयाताईंनी शिक्षणाने धीटपणा, विश्वास व माणूसपणा वाढतो असे समजाविले. प्रा. इंगळे म्हणाले, 'बाया वेड्या अन् पुरुष शहाणे म्हणण्यानेच दोघेही वाया गेले– म्हणजेच घर वाया गेलं– पोरं बिचकली. आता असले न्यूनगंड संपवू.'

महाराष्ट्र शे. शे. पंचायतीचे संघटक श्री कुमार जोशींनी शे. शे. पंचायतीची भूमिका व आजची ताकद सांगून संघटनेने दिलेले लढे व त्यातून रोजगार हमी कामात मिळविलेली मजूरी दरवाढ, नवे हक्क व धान्य रूपीमजूरी हे लाभ झाल्याचे समजावून दिले. व्यापक व भक्कम संघटना केली तर कायम काम, औषधी सोयी, बाळंतपणाची रजा वगैरे सोयी मिळून, काममोजणीतल्या लबाड्या थांबून, अधिकाऱ्यांवर वचक राखता येईल असे सांगितले. या सर्व गोष्टी झाल्या तर खाजगी शेतीमालकांकडून होणाऱ्या त्रासाला बंधने येऊन मजूरीत वाढ होण्याचा विश्वास त्यांनी दिला.

शिबिर संघटक सौ. हिराबाई येलमे यांनी स्त्रियांना एकीची गाणी, संघटनाची गाणी, लढ्याची गाणी शिकवली. 'सव्वालाचा जवाब दे र देशाच्या सरकारा– इंदिरा सरकारा' हेही गाणे फार प्रिय झाले. गीतांचा प्रभाव इतका जबर झाला की या अनपढ बायांनी १५ पुस्तिका चक्क खरेदी केल्या!

तालुका खादी ग्रामोद्योग अधिकारी श्री. कोरे यांनी अंबरचरखा, विजेची तेलघाणी, रेशीम शेती, शास्त्रीय कुंभारी काम, सुतारी, मध उत्पादन वगैरे उद्योग समजावून दिले तर बार्शी तालुका विकास अधिकारी श्री. मार्तण्डे यांनी शेतीपूरक पशु-वृक्षपालन, बलुतेदार, सोसायटी, ट्रायसेम शिलाईकाम योजना समजावून देवून भगिनींच्या अर्जांना स्वतः मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले.

महागाई व सदोष वाटप व्यवस्थेची आर्थिक राजकीय व वर्गीय कारणे श्री संभाजीराव जगदाळे यांनी समजावून दिली तर त्यांनी बार्शी तालुका पशुवैद्य डॉ. उन्हाळे यांनी मिळून कोंबड्या व शेळ्या पाळण्याचे शास्त्रशुद्ध मार्ग सांगितले. परंपरागत पशुपालनातले दोष दिसून आल्यामुळे 'आपलंच चुकतं अन् कोंबड्या पटापट मरतात.' याची भगिनींनी नोंद घेतली. डॉ. वीणाताईंनी स्त्रीचे स्वावलंबन-समानता व मुक्ती विचार समजावले तर सौ. आशाताई भोसले यांनी बालमृत्यू व स्त्री अनारोग्य यांच्या संदर्भातून कुटुंबनियोजनाच्या ऑपरेशन्सच्या वाढत्या संख्येवर अडथळा येतो आहे–संख्या घटते आहे म्हणून बाल आरोग्यावर त्यांनी भर दिला. 'अंधश्रद्धा व रूढींचे बळी' हा विषय श्री चुनीलाल नहार

यांनी तर ‘ अंधश्रद्धा व विज्ञानाचा प्रकाश ’ हा विषय श्री जितकर गुरुजींनी बहारीने रंगवला. खेडूत बायांना विज्ञान आपल्या अंगणात रेडिओच्या रूपाने आलेले आहेच हे उमजल्याने आश्चर्य वाटलेले दिसले. प्राचार्य चंद्रकांत मोरे यांनी ‘ मानव तितुका एक ’ या विषयातून जाती नष्ट करण्याचे विचार सांगितले.

वक्त्यांनी विषय सोप्या भाषेत सांगितले तर सौ. हिराबाई येलमेंच्या गाण्याची ललकार श्रोत्यांना ताजेतवाने करीत असे. त्यांच्या तरल संचलनामुळे बायका कधी कंटाळलेल्या दिसल्या नाहीत की कोणी पाय पसरून बसली नाही. पुणे जिल्ह्याच्या भगिनी अनुभव कथनात प्रेरक ठरल्या अन् त्यांच्या मागोमाग एकेकजण बोलकी होऊ लागली. कोणी विधवा माता, दीर वाटणी टाळण्यासाठी कुऱ्हाड घेऊन अंगावर आल्याचे सांगे– तर चाऱ्याची भावी ‘ गावाइरुद्ध कसं जावं ’ अशी शंका घेई. बोरगावकर म्हणाल्या, ‘ जातवालं गावाभाईर जित्त यू द्यायच न्हाईत. ’ सगळ्यांवर कडी केली शिराळचाच्या भोई फुलाबाईने. शिराळचाचे धनदांडगे व अन्य नागरिक भूमिहीनांच्या शेतांवर जनावरे घालून पीक नष्ट करीत आहेत. गावकरी गावच्या तळचातल्या गाळपेर जमिनीवर अतिक्रमण करतात, पण हरिजन-भोई लोकांनी सरकारी परवानगीने त्या जमिनी केल्या तर पोलिस व मामलेदार यांना गुंडाळूनही पुंडाई करीत आहेत, कोण्या जाळत आहेत– कोर्टखटले चालू आहेत– ही सगळी हकिगत फुलाबाईने तिच्या खेडूत भाषेत अशी जिवंत केली की तिची कथा टेप करून आकाशवाणीवर देण्याचा आम्ही विचार केला, तर बायांनी शिराळचावर मोर्चा नेण्याची तयारी केली.

शनिवारी रात्री चांदणे-कबीर आणि जावळी पार्टीच्या गाण्यांनी दलित चळवळीचे दर्शन घडवले तर रविवार संध्याकाळ ‘ आक्का, तू कुठंय ?’ – बाओ मी हियंय ’ या आंधळचा कोशिबिरीच्या खेळाने घुमवली. साठ वर्षांची म्हातारीही डोळे बांधून बाईला तुंबा मारायला धावली– धडपडली– पडली– अन् हास्याचा कल्लोळ उठला. रविवारी रात्रीच्या निरोपाच्या गोड जेवणानंतर श्री जितकर गुरुजीच्या ‘ विज्ञानाच्या गुजगोष्टी ’ चांगल्या रंगल्या. आपल्या अंगणातल्या रेडिओ व विजेच्या रूपाने विज्ञानच आपण हाती घेतल्याचे कळताच बायका खूप आनंदून गेल्या. गुरुजींनी बायकांना चंद्रावर नेऊन बसवले !

समारोप रात्री ९॥ ला सुरू केला. श्री रोहिदासजी कांबळेनी समारोप करताना इशारा दिला की, गरिबांच्या नडवणुकीची नोंद घेऊन उच्चवर्णीयांनी बदल घडवावा नाहीतर गरिबांच्या संघटनेतून उद्याची नवी पिढी अन्याय करणारांना जाब विचारील. अंगठेबहाद्दर व फाटक्या वस्त्रानिशी शिबिरात येऊन दोन दिवस भाषणांना दाद देणाऱ्या बायकांनी ती चुणूकच नाही का दाखवली ? बार्शी नगरपालिका, गुजराथी समाज मंडळ, कामदुज फोटो स्टूडिओ ( फोटो मोफत दिल्यामुळे ) व सर्व कार्यकर्ते व शिबिरार्थी भगिनी यांचे आभार मानताना सौ. येलमे यांच्या १५ भगिनींची संघटनासमिती तयार झाल्याच्या वृत्ताचे स्वागत टाळ्यांच्या गजराने व घोषणा दुमदुमून झाले.

– डॉ. वीणा सुराणा

## एस. टी. दरवाढविरोधी युवा जनतेची निदर्शने

नांदेड दि. १६ : महाराष्ट्र युवा जनताचे सरचिटणीस श्री. राम अय्यर व नांदेड युवा जनताचे अध्यक्ष श्री. भगतसिह ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली एस. टी. दरवाढ व महागाई विरोधी युवा जनताच्या १०० कार्यकर्त्यांनी बस स्थानक व कलेक्टर कचेरीसमोर निदर्शने केली व दोन्ही ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. निदर्शक विष्णूनगर येथून मोर्चाने आले होते.

—राम अय्यर

---

## मराठी बोलपट सुवर्णमहोत्सव

● मराठी बोलपटाला ६ फेब्रुवारी १९८२ रोजी ५० वर्षे पूर्ण होतील. पहिला मराठी बोलपट ‘ अयोध्येचा राजा. ’ कै. बाबूराव पेंटर आणि आनंदराव पेन्टर यांनी प्रथम कॅमेरा तयार केला. मराठी चित्रपट महामंडळ सुवर्णमहोत्सव साजरा करीत असून पहिल्या बोलपटातील कलावंतांचा त्यानिमित्ताने सत्कार होईल.

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय परिसंवाद

‘ दिवसेंदिवस सामाजिक जीवनातून मूल्यांचे महत्त्व झपाट्याने कमी होत आहे ही आज खरी गंभीर बाब आहे मूल्यांचा जपवणूकीसाठी उदारमतवादी शिक्षणाची गरज आहे.’ असा इशारा प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांनी उदगीर येथील एका महाविद्यालयीन परिसंवादाच्या अध्यक्षस्थानावरून दिला.

‘ उच्च शिक्षणातील कलाक्षेत्राची अवकळा ’ हा परिसंवाद तेथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाने ‘ विद्यापीठ वर्धापनदिना ’-निमित्त आयोजित केला होता.

‘ कलेला कधीही अवकळा येत नसते ’ असा विचार प्रा. गवळी यांनी मांडला व माणूस केवळ भाकरीवर जगत नाही तर तो मूल्यांवर जगत असतो हे सांगितले.

‘ अवकळा म्हणजे काय ?’ त्याचे स्वरूप वगैरे मुद्दे डॉ. गो. ग. कुलकर्णी यांनी उपस्थित केले. कला क्षेत्राचे स्वरूप पालटले पाहिजे व मानवी मूल्यांचा अभ्यास अशासारखा विषय विज्ञान व वाणिज्य शाखेत सक्तीचा केला पाहिजे.’ असे मत प्रा. बोकील यांनी मांडले.

‘ कला क्षेत्रांतील अवकळा ’ हा विचार व्यक्तिसापेक्ष आहे. आजची स्थिती ही तात्पुरती आहे. असे प्रा. नचके म्हणाले.

प्रा. नरेंद्र मेहेरा यांनी सांगितले की कला क्षेत्राचे स्वरूप जॉब ओरिएंटेड कोर्सेससारखे केले तर ही अवकळा कमी होईल.

या अवकळेची कारणामीमांसा करताना प्रा. जी. एस्. बारद म्हणाले, ‘ माणूस केवळ भाकरीवर जरी जगत नसला तरी भाकरीशिवायही तो जगू शकत नाही. म्हणून माणसाच्या जीवनात आर्थिक प्रश्नाला निश्चितपणे जास्त प्राधान्य आहे.’ नोकऱ्या मिळण्याची कमी शक्यता हेच कला क्षेत्राच्या अवकळेचे खरे कारण असे प्रतिपादून प्रा. बारद पुढे म्हणाले, “ जर कला क्षेत्राला उर्जितावस्था प्राप्त करून घ्यावयाची असेल तर आजच्या आर्थिक रचनेत मूलगामी बदल करावे लागतील व कला शाखेचे स्वरूपही जॉब ओरिएंटेडच्या दृष्टीने बदलावे लागते. ‘ मूलभूत आर्थिक गरजा भागल्यानंतरच मूल्यांना महत्त्व प्राप्त होते. उपाशीपोटी माणूस मूल्यांचा विचार करू शकत नाही. ’

डॉ. तोंडारे, प्रा. बिभूते आदींनी आपले दृष्टिकोण मांडले.

◎ ◎